# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**जावक क्रमांक :- २०१** **दिनांक :- २४/०७/२०२१**

## सन २०१९ मधील खुनाच्या गुन्हयातील फरार आरोपीत यास उत्तर प्रदेश येथुन ताब्यात घेण्यास गुन्हे शाखा कक्ष -३ यांना यश

दिनांक ०१/०३/२०१९ रोजी तक्रारदार नामे - मनिष भिकु बामनिया, वय-३१ वर्षे व्यवसाय- इस्टेट एजंन्ट रा. क्रिश विहार बिल्डींग नं. ०२, प्लॅाट नं. ३०४, भास्कर आळी, वसई गांव, ता. वसई जि. पालघर यांनी फिर्याद दिली की, दिनांक दि.०१/०३/२०१९ रोजी १०.३० वाजेच्या पुर्वी नालासोपारा पुर्व यशवंत एम्पायर बिल्डींगचे अे विंगचे समोर मोकळया जागेत झाडाखाली मयत श्रीमती योगिता मनोज देवरे हीस कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरुन ओढणीने गळा आवळुन जिवे ठार मारुन तिचे प्रेत नालासोपारा पुर्व यंशवंत एम्पायर बिल्डींगचे अे विंगचे समोर मोकळया जागेत झाडाखाली टाकुन पळुन गेले बाबत, तक्रारदार यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन तुळींज पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर २७८/२०१९ भा.दं.वि.सं. कलम ३०२, २०१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्हयात यापुर्वी ७ आरोपीत अटक करण्यात आले होते परंतु सदर गुन्हयात सक्रीय सहभाग असलेला आरोपीत नामे कार्तिक प्रदिप सिंग वय - २३ वर्षे, श्री साई अपार्टमेंट, रु नंबर ३०२, क्रिशराज रिक्षा स्टॅन्ड जवळ, गाला नगर, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर हा गुन्हा घडल्यापासून आपले अस्तित्व लपवुन होता. नमुद आरोपीत याचे वास्तव्याबाबत माहिती मिळणे करीता वारंवार पाठपुरावा करुन बातमिदारांमार्फत गोपनीय माहिती काढुन आरोपीत नामे- कार्तिक प्रदिप सिंग यास प्रतापपुर, जि. चंदोली, उत्तरप्रदेश येथुन शिताफीने ताब्यात घेण्यात आले असुन त्यास दिनांक २४/०७/२०२१ रोजी मा. वसई न्यायालयात हजर केले असता दिनांक २९/०७/२०२१ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर करण्यात आली असुन पुढील तपास तुळीज पोलीस करीत आहे.

सदरची कामगिरी डॅा. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष -३ चे पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पो.उप.निरी. उमेश भागवत, पो.ना. १४६७ मनोज सकपाळ, पो.ना. १९९१ मुकेश तटकरे यांनी कौशल्यपुर्वक पार पाडली आहे.

----oooo----